-: प्रेसनोट :- दिनांक - १५/०९/२०२४

'' तिन पत्ती जुगार चालू असलेल्या जुगार अड्डयावर छापा कारवाई करून एकूण ३४ इसमांविरूध्द कारवाई करून रू. रू १४,६१,४००/- (चौदा लाख एकसष्ठ हजार चारशे रूपये) व इतर मुद्देमाल हस्तगत केल्याबाबत ''

गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष - ३, मुंबई येथे प्राप्त झालेल्या विश्वसनिय माहिती प्राप्त झाली होती की, डी.पी.वाडी, घोडपदेव, भायखळा, मुंबई याठिकाणी काही इसम ०३ पत्त्यांचा जुगार पैशाच्या सहाय्याने खेळवून सदर ठिकाणी जुगार क्लब चालवित आहे. प्राप्त झालेल्या माहितीची शहानिशा करण्याकरीता गु.प्र.शा. गु.अ.वि., कक्ष -३, मुंबई चे प्रभारी पोलीस निरीक्षक प्रभारी पोलीस निरीक्षक सदानंद येरेकर यांनी कक्ष कार्यालयातील पो.नि. शरद धराडे, स.पो.नि. समीर मुजावर, पो.उ.नि. राणे, श्रेणी पोलीस उप निरीक्षक गोरेगावकर, स.फौ.३१८७३/राऊळ, पो.ह.क्रं. ९७१०८७/देवार्डे, पो.ह.क्रं. ०३२०८/अनभुले, पो.ह.क्रं. ०३१०१६/कांबळे, पो.ह.क्र. ०३११८९, पो.ह.क्रं. ०४०७०५/देशमुख पो.शि.क्रं. ०९१५९२/चव्हाण, पो.शि. चा.क्रं. १५०७८०/तांबडे यांनी नमुद ठिकाणी दिनांक १५/०९/२०२४ रोजी ०२.१५ वाजता स्टील इंडस्ट्रिअल कार्पोरेशन गोडावून मधील रूम, गोटेश्वर मैदान, डी.पी.वाडी, घोडपदेव, भायखळा, मुंबई १० याठिकाणी जावून छापा कारवाई केली असता, नमुद ठिकाणी ०४ इसम भागिदारीमध्ये तिन पत्ती नावाचा जुगाराचा क्लब चालवित असल्याचे दिसून आले. दोन पंचासमक्ष केलेल्या कारवाईमध्ये त्याठिकाणाहून ०४ मालक यांच्यासह ३ जॉकी, १९ पुरूष खेळाडू व सदर ठिकाणी काम करणारे ८ इसम असे एकूण ३४ इसम मिळून आले. सदर कारवाईमध्ये नमुद इसमांच्याकडून एकूण रू. १४,६१,४००/- (चौदा लाख एकसष्ठ हजार चारशे रूपये) पत्त्याचा डाव, पत्त्याचे १२ डाव असलेला एक बॉक्स व इतर मुद्देमाल मिळून आला.

नमुद इसमांच्याविरूध्द भायखळा पोलीस ठाणे येथे सरकारतर्फे फिर्याद देवून, भायखळा पोलीस ठाणे गु.र.क्रं. ६३७/२०२४ कलम ४(अ), ५ मुंबई जुगार प्रतिबंध कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची यशस्वी कामगीरी मा.पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई श्री.विवेक फणसळकर, मा.विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री.देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मुंबई श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशिकुमार मीना, मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)श्री. दत्ता नलावडे व मा.सहा.पोलीस आयुक्त,प्रकटीकरण(मध्य) श्री.चेतन काकडे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष -३ चे प्रभारी पोलीस निरीक्षक सदानंद येरेकर, पो.नि. शरद धराडे, स.पो.नि. समीर मुजावर, पो.उ.नि. अशोक राणे, पो.उ. नि. गणेश गोरेगावकर, स.फौ. कृतिबस राऊळ, पो.ह. रविंद्र देवार्डे, राहुल अनभुले, सुहास कांबळे, प्रमोद भोजणे, युवराज देशमुख, विकास चव्हाण, संजय तांबडे यांनी पार पाडली आहे.

-------------